म. ग्रं. सं. ठाणें

विषय किरकोड

सं. क्र. २९७

प्र: कार्ड ४८२

२९७

६३

किरकोड

सं. ठाणें

मराठी ग्रं. संग्रहालय

# जशास तसें—( पुरवणी )

अर्थात्

आपल्या "सरस्वतीमंडला" स मजबुती आणण्या साठीं ह्मणून रामभाऊंनींच मारून कुटून केलेल्या "भ्रमनिरास" (भ्रमविलास ?) नांवाच्या पुस्तकाच्या स्वरूपानें थोडक्यांत निरूपण.

---

रा॰ रा॰ भा॰

एक महाराष्ट्र ( कऱ्हाडा ब्राह्मण )

यानें केलें,

तें

मुंबईंत,

"फ्यामिली प्रिंटिंग प्रेस" मध्यें छापिलें.

---

१८८५.

# वार्ताहर.

प्रत्येक रविवारीं प्रातःकाळीं प्रसिद्ध होत असतें.

**(वर्षाची किंमत अवघा एक रुपाया.)**

या पत्रांत जगातील निरनिराळ्या भागांवरच्या शेलक्या बातम्या, स्वदेशांतील ताजीं व निवडक वर्तमानें, काळ्या गोऱ्यांचे होणारे सामने अर्थात् जुलुमाच्या गोष्टी, एखादा देशस्थितीच्या विषयावर थोडक्यांत चटकदार असा निबंध व एखाद्या संस्थानाची ऐतिहासिक माहिती, ह्या सर्व गोष्टींचा यथावकाशें समावेश होत असतो. मूळ पत्रकांत रिकाम्या नोटिसा नसतात. वर्गणीदार होऊ इच्छिणारांनीं आपलीं नांवें पत्त्यासह खालीं सही करणाराकडे मुंबईंत 'फ्यामिलि प्रिंटिंग प्रेस,' नं० १४३ दादीशेट अग्यारी रोडवर पाठवावीं. ट० हं० एक रुपया.

बाळाजी कृ० रघुनाथजी.

मराठी ... नि
नं० १८
ठाणें सन १८९८

# जशास तसें—( पुरवणी )

अर्थात्

आपल्या "सरस्वतीमंडला" स मजबुती आणण्या-
साठीं ह्मणून रामभाऊंनींच मारून कुटून केलेल्या
"भ्रमनिरास" (भ्रमविलास ? ) नांवाच्या
पुस्तकाच्या स्वरूपाचें थोडक्यांत
निरूपण.

रा० रा० भा०
एक महाराष्ट्र ( कऱ्हाडा ब्राह्मण )
यानें केलें,

तें
मुंबईत,
"फ्यामिली प्रिंटिंग प्रेस" मध्यें छापिलें.

१८८५.

# प्रस्तावना.

रा. रा. भा. कोण हें माहीत नसून निनांवी पुस्तक छापण्याचा मतलब समजत नाहीं व सरस्वतीमंडलांतील माहिती इतिहासदृष्ट्या आहे असा रामभाऊंचा सूचनेवरून व उपोद्घातावरून अभिप्राय दिसतो. रा. रा. भा. नें 'जशासतशा' ची एक प्रत रामभाऊंस सलामपूर्वक पाठविली आहे. ज्या गृहस्थानें ती प्रत रामभाऊंस नेऊन दिली आहे त्यासही रा. रा. भा. चें पुरें नांव नीट माहीत आहे. तेव्हां रा. रा. भा. कोण तें आपणास माहीत नाहीं हा रामभाऊंचा लेख थोडासा धाडसाचा दिसतो. तशांत रा. रा. भा. कोण हें जर रामभाऊंस खरोखरच माहीत नसतें तर 'कऱ्हाड्यांच्या कुळांत जन्मून तुह्मीं कऱ्हाड्यांचा चांगला उद्धार केलात' असा जो रा. रा. भा. स पहातांच 'विविधज्ञानविस्तारा' च्या हफीसांत रामभाऊंनीं जोरानें उद्गार काढिला व ज्यामुळें रा. रा. भा. स 'शेणव्यांच्या कुळांत जन्मून जितका शेणव्यांचा उद्धार तुह्मीं केलात

# वार्ताहर.

प्रत्येक रविवारीं प्रातःकाळीं प्रसिद्ध होत असतें.

**(वर्षाची किंमत अवघा एक रुपाया.)**

या पत्रांत जगातील निरनिराळ्या भागांवरच्या शेलक्या बातम्या, स्वदेशांतील ताजीं व निवडक वर्तमानें, काळ्या गोऱ्यांचे होणारे सामने अर्थात् जुलुमाच्या गोष्टी, एखादा देशस्थितीच्या विषयावर थोडक्यांत चटकदार असा निबंध व एखाद्या संस्थानाची ऐतिहासिक माहिती, ह्या सर्व गोष्टींचा यथावकाशें समावेश होत असतो. मूळ पत्रकांत रिकाम्या नोटिसा नसतात. वर्गणीदार होऊ इच्छिणारांनीं आपलीं नांवें पत्यासह खालीं सही करणाराकडे मुंबईंत 'फ्यामिलि प्रिंटिंग प्रेस,' नं० १४३ दादीशेट अग्यारी रोडवर पाठवावीं. ट० हं० एक रुपया.

**बाळाजी कृ० रघुनाथजी.**

नं० १८
ठाणें सन १८९

# जशास तसें—( पुरवणी )

अर्थात्

आपल्या " सरस्वतीमंडला " स मजबुती आणण्या-
साठीं ह्मणून रामभाऊंनींच मारून कुटून केलेल्या
" भ्रमनिरास " ( भ्रमविलास ? ) नांवाच्या
पुस्तकाच्या स्वरूपाचें थोडक्यांत
निरूपण.

**रा० रा० भा०**

एक महाराष्ट्र ( कऱ्हाडा ब्राह्मण )
यानें केलें,

तें

मुंबईंत,
" फ्यामिली प्रिंटिंग प्रेस " मध्यें छापिलें.

---

१८८९.

# प्रस्तावना.

रा. रा. भा. कोण हें माहीत नसून निनांवी पुस्तक छापण्याचा मतलब समजत नाहीं व सरस्वतीमंडलांतील माहिती इतिहासदृष्ट्या आहे असा रामभाऊंचा सूचनेवरून व उपोद्घातावरून अभिप्राय दिसतो. रा. रा. भा. नें 'जशासतशा' ची एक प्रत रामभाऊंस सलामपूर्वक पाठविली आहे. ज्या गृहस्थानें ती प्रत रामभाऊंस नेऊन दिली आहे त्यासही रा. रा. भा. चें पुरें नांव नीट माहीत आहे. तेव्हां रा. रा. भा. कोण तें आपणास माहीत नाहीं हा रामभाऊंचा लेख थोडासा धाडसाचा दिसतो. तशांत रा. रा. भा. कोण हें जर रामभाऊंस खरोखरच माहीत नसतें तर 'कऱ्हाड्यांच्या कुळांत जन्मून तुह्मीं कऱ्हाड्यांचा चांगला उद्धार केलात' असा जो रा. रा. भा. स पहातांच 'विविधज्ञानविस्तारा' च्या हफीसांत रामभाऊंनीं जोरानें उद्गार काढिला व ज्यामुळें रा. रा. भा. स 'शेणव्यांच्या कुळांत जन्मून जितका शेणव्यांचा उद्धार तुह्मीं केलात

तितकाच कऱ्हाड्यांच्या कुळांत जन्मून मी कऱ्हाड्यांचा केला, अधिक कांहीं नाहीं' असा लागलाच जबाब देणें भाग पडलें तो उद्गार रामभाऊंच्या तोंडून बाहेर पडला असता काय? पण दुराग्रहानें व स्वत: शेणवी असल्यामुळें जात्यभिमानानें जें 'भ्रम' पटल रामभाऊंच्या डोळ्यांवर आलें आहे तें इतकें दाट आहे कीं त्याचा 'निरास' त्यांचा त्यांस करितां येत नाहीं .व त्यामुळें वार्ताहरकर्ते व रा. रा. भा. हे अगदीं निराळे असतांही रामभाऊंस (पृ० ३४, ओ० २१) एकच भासत आहेत. रा. रा. भा. स आपल्या अवाच्य पुस्तकाची प्रत पाठविण्याचा बिकट प्रसंग न पडावा ह्मणून 'जशास तसें' कोणी लिहिलें तें समजत नाहीं असा आव रामभाऊंनीं घातला आहे, आणि कांहीं नाहीं. रा. रा. भा. नें 'जशास तसें' बाहेर पडतांच त्याची एक प्रत रामभाऊंस पाठविली. त्याप्रमाणें 'भ्रमनिरासा' चीही एक प्रत रा. रा. भा. स पाठविणें हा रामभाऊंचा धर्म होता. तशांत 'जशास तशा' च्या प्रस्तावनेंत छापखान्याच्या पत्त्यावर हवा तितका पत्रव्यवहार करण्यास रा. रा. भा. नें मोकळीक दिली आहे. तेव्हां जरी रा. रा. भा. कोण व तो कोठें राहतो हें रामभाऊंस खरोखरीच माहीत नाहीं असें ह्मटलें तरी सभ्यपणाचें आलंबन करून

छापखान्यांत 'भ्रमनिरासा'ची एक प्रत रा. रा. भा. च्या नांवावर पाठविण्यास रामभाऊंस हरकत कोणती होती? तशांत जर 'जशास तसें' हें खरोखरी निनांवी तर स्वप्रतिज्ञेचा स्वत:च भंग करून 'भ्रमनिरास' लिहिण्यास 'फुरसत' तरी रामभाऊंस सांपडली कशी? जर आपल्या जातीमध्यें आपले नांव गाजावें अशी रा. रा. भा. ची थोडी तरी इच्छा असती तर त्यानें आपलें पुरें नांव घातलें असतें. पण असल्या क्षुद्र व क्षुल्लक विषयावर लिहून जातीचे तोंडीं आपलें नांव करणें व जातिभेदास आलंबन देऊन थोडा बहुत सर्व जातींमध्यें बेबनाव आहे तो वाढविणें हें रा. रा. भा. स तरी शहाणपणाचें काम वाटत नाहीं. व्रत घेतलें आहे तें रामभाऊंनीं खुशाल यावज्जीव चालवावें व आपल्या शेणवी जातींत आपलें माहात्म्य हवें तितकें वाढवून घ्यावें. सरस्वतीमंडल जर इतिहासदृष्ट्या लिहिलेलें असतें तर व्यास, वाल्मीकि, परशुराम, षड्दर्शनकार वगैरे ऋषिमंडळी सारस्वत (शेणवी) बनली नसती, आणि मुंबईकर व गांवकर शेणवी जरी केवळ मत्स्यभक्षण करितात, चतुष्पादाची व शिकारीची सागुती त्यांस चालत नाहीं तरी ती वाडीकर व वेंगुर्लेकर या दोहोंस खुशाल चालत्ये, हा लेख येण्यास अनुमान होताना. 'चालत नाहीं' असें ठोकून देणें सोपें,

पुरावा करणें कठिण आहे. रामभाऊ हे 'हिंदु युनियन क्लब' चे माजी Vice President होते असें ह्मणतात. हिंदूंचें 'युनियन' तर दूरच राहूं दे; पण महाराष्ट्र लोकांचें 'युनियन' करण्याचा जो अपूर्व उपाय रामभाऊंनीं योजिला आहे तोच फार विलक्षण भासतो. अशा रीतीनें 'युनियन' करिण्याचें काम जर 'युनियन क्लब' चे शेणवी जातीचे दुसरे कामगार जारीनें चालवतील तर पारावारच नाहीं आमच्या या महाराष्ट्र भूमीच्या भाग्यसंपत्तीला !! जाहीरात लांबलचक छापून पूर्वींच सह्या घ्याव्या तर मजकूर न पहातां रामभाऊंच्या पूर्वींच्या नांवावर कित्येक ब्राह्मण जातींतील सरस्वतीमंडलाचे वर्गणीदार होऊन हल्लीं पस्तावत आहेत, तसा इतर जातींमध्यें कदाचित् कोणास पस्तावण्याचा प्रसंग येईल. तो न यावा ह्मणून सह्या अगोदर घेतल्या नाहींत. तशांत सह्यांवर जर छापणें अवलंबून असतें तर त्या जरूर पूर्वींच घेतल्या असत्या. तसें कांहीं नसल्यामुळें पूर्वीं 'जशास तसें' छापलं ( पहिल्यानें Prospectus काढला होता, पण ती वातमी रा. रा. भा. स लागतांच त्यानें ते सर्व कागद फाडून टाकण्यास सांगितले ) तेव्हां व हल्लीं या 'पुरवणी' च्या वेळींहीं पूर्वीं सह्या घेण्याची खटपट रा. रा. भा. स पसंत पडली नाहीं. पुढील पृष्टांत 'जशास तशां' तील

४६ मुख्य मुद्दे पहिल्यानें दिले आहेत; व त्यांच्याच पुढें रामभाऊंच्या 'भ्रमनिरासां' त उत्तरें सांपडलीं तितकीं दिलेलीं असून, उत्तरांच्या पुढें कंसांत त्या उत्तरांवर टीका आली आहे.

रा. रा. भा.

ता० २७ मे १८८९.

# जशास तसें--पुरवणी.

## जशास तसें.

१–सारस्वत सर्व ब्राह्मणांत वडील ह्मणण्यास प्रमाण नाहीं. क्षणभर जरी ह्मटलें कीं सारस्वत वडील तरी शेणवी हे सारस्वतच खरे असें ह्मणण्यास प्रमाण काय? २–द्रविड हे कालज्येष्ठ व विद्याज्येष्ठ, व गौड द्रविडांचे कालकनिष्ठ व विद्याकनिष्ठ बंधू. ३–पंच गौड व पंच द्रविड हे भेद शालिवाहन शकाच्या पांचव्या किंवा सहाव्या शतकांत होते असें ह्मणण्यास प्रमाण काय! ४–'सरस्वती' प्रमाणें 'विपाशा' वगैरे पंजा-

## भ्रमनिरास.

१–सरस्वतीचें तीर मनूनें पवित्र मानिलें आहे. (दुसऱ्या प्रश्नाचें तर उत्तर नाहींच. मनूंत सरस्वती नदी आली आहे. पण 'सारस्वत' ब्राह्मण नाहींत व शेणवीही नाहींत. सरस्वती नदीचें नांव मनूंत आहे, ह्मणून सारस्वत ब्राह्मण सर्व ब्राह्मणांत वडील व शेणवी हे अस्सल सारस्वत ! ! !) २–ब्राह्मणी धर्म आर्यांकडून द्रविडांस मिळाला ह्मणून गौड विद्याज्येष्ठ, व अगस्त्य वगैरे संस्कृतज्ञ होते ह्मणून गौड. (ब्राह्मणी धर्म खि-

यांतील नद्या पूर्वीही होत्याच; असें असतां व्यास वगैरे मंडळी **एका सरस्वतीच्या** तीरावर रहाणारी असें ह्मणण्यास प्रमाण काय ? ५—दधीच ऋषि 'सारस्वत' होता या पौराणिक कथेंत 'सारस्वत' ( सरस्वत्या अपत्यं पुमान्) शब्द तद्धितांत; जातिवाचक नव्हे. रामभाऊ जातिवाचक करितात ती चूक. ६—'दिग्विजय' ग्रंथ कोणता ? ७—देशस्थ हे मुळचे शेणवी ह्मणण्यास आधार काय ? ८—गौडपाद शेणवी कशावरून ? ९—सर्व महाराष्ट्रभर पौरोहित्य पूर्वी गोळकांचें होतें कशावरून ? १०—पौरोहित्य शास्त्रादिकांवरून पहातां ब्राह्मणांच्या षट् कर्मांपैकीं एक. जर केवळ कंटाळा आला ह्मणून शेणवी तें करीत नाहींत हे स्ती धर्माप्रमाणें स्वरूपभेद कधींही न पावणारी चीज नव्हे. तशांत आर्यांनीं द्रविडांस पहिल्यानें धर्म दिला यास तरी प्रमाण काय ? संस्कृत जितके जाणतील तितके काय गौड ? तर मग अकबराचा मुलगा 'दारा शेखो' ही गौड झाला ! संस्कृत भाषा हल्लींच्या मराठी वगैरे भाषांप्रमाणें सर्व जातीचे लोक बोलत होते यास तरी प्रमाण काय.) ३—प्रमाण देण्याची जरूरी ( पृ० ७० ) नाहीं. ( तर रा. रा. भा. चा नाइलाज आहे ). ४—(उत्तर नाहीं ) ५—( उत्तर नाहीं. परशुराम वगैरे ऋषी 'सारस्वत' 'सारस्वत' असा रामभाऊंनीं कितीही जप चालविला तरी त्यांस सारस्वतत्व मिळणें नाहीं. कोलंबसानें अमेरिका

खरें तर शेणव्यांनीं त्यांस त्रिकर्मी कोणी ह्मटल्यास चिडूं नये. महाराष्ट्र देशांत ब्राह्मणांमध्यें, क्षत्रियामध्यें किंवा वैश्यांमध्यें शेणव्यांचें पौरोहित्य पूर्वी कधीं चालत होतें किंवा हल्लीं तें चालतें असें ह्मणण्यास आधार नाहीं. ११—कोंकणपट्टींत पंतोजी पूर्वी सर्व शेणवी होते व जयगडच्या खाडी-पासून लेखणीचे स्थायिक अधिकारी शेणवीच कशावरून? १२—सावाजी अनंत चतुर शेणवी कशावरून? गोंवाप्रांतीं शेणव्यांनीं किर्वंतांस आपल्या मुली दिल्या व त्यांच्या आपण केल्या असें ह्मणण्यास प्रमाण काय? १३—शककर्ते शिवाजी महाराज यांनीं वंशपरंपरेनें मंत्रित्व शेणव्यांस दिलें असें ह्मणण्यास प्रमाण काय? १४—शोधून काढली, व ८२ व्या पृष्ठावर रामभाऊंनींही 'सारस्वत' देश शोधून काढिला आहे!) ६—('दिग्विजय' यज्ञ हा शब्द रामभाऊंनींच वापरलेला. तरि तो अपूर्व यज्ञ कोणता ह्मणून रा. रा. भा. विचारितो तेव्हां रामभाऊ मराठींत ९ ओळी लिहितात व त्यांविषयीं रा. रा. भा. सच चौकशी करण्यास सांगतात!) ७—लोकहितवादी ह्मणतात. (लिहिण्यास फार वाईट वाटतें कीं लोकहितवादींचें वचन कवडीच्याही किंमतीचें पुष्कळ ठिकाणीं दिसत नाहींत. आज लोकहितवादी पळशांची जात हलकी ह्मणतात, व उद्यां कोणी चापून नोटीस पाठविली ह्मणजे लागलेंच पळशांस ब्राह्मणत्व मिळतें!!!) ८—(उत्तर नाहीं). ९—

रामचंद्र बाबा शेणवी गुणनिधान नव्हता. तो लांच खात असे, व नानासाहेब व भाऊसाहेब या दोहोंमध्यें एकदा फूट पाडली होती रामचंद्र बाबानें. १५—जिवबा दादा शूर होते. पण ते महादजी शिंद्याच्या पदरचे. शिवाजी महाराज व बाजी बल्लाळ या दोहों प्रमाणें महादजी शिंदा मोठा कर्ता. तरी त्याच्या कर्तृत्वाचा अपलाप करून त्यानें केलें तें सर्व जिवबा दादानें केलें असें ह्मणण्यास प्रमाण काय? १६—भट्टोजि दीक्षित शेणवी कशावरून? १७—विठ्ठल नरसिंह वीडकर शेणवी कशावरून? १८—शेणवी हा 'शर्मन्नार्य' शब्दाचा अपभ्रंश समजणें पोरकट. 'शहानवीस' ह्मणजे कारकून. या 'शहानवीस' शब्दाचा

फौजदारींतील कलह पहा. (पण सरस्वतीमंडल लिहिलें तेव्हांचा आधार कोणता? तेव्हां फौजदारी कलह नव्हता. आतां तरी त्या विषयीं चौकशी करून लिहिण्याचें काम रामभाऊंचें कीं रा. रा. भा. चें?). १०—(नीट उत्तर नाहीं. गोमांतकांत, देशावर नगर जिल्ह्यांत चौकशी करावी ह्मणून रामभाऊ ह्मणतात. पण ही शेणव्यांविषयींची चौकशी सरस्वती-(शेणवी) मंडल कर्त्ते शेणवी रामभाऊ यांनीं करावयाची कीं कऱ्हाडा रा. रा. भा. यानें करावयाची?) ११—(नीट उत्तर नाहीं. रामभाऊंनीं उतारा दिला आहे त्यांत शेणव्यांचें नांव आहे तसें कोंकणस्थांचेंही आहे. असें असतां शेणवीच स्थायिक अधिका-

शेणवी हा अपभ्रंश दिसतो. १९–शेणवी मत्स्यमांस उघडपणें खातात. चोरतात विशेष ब्राह्मणांपासून व बरें च इतर जातींपासून. स्वतःच्या जातीपासून चोरीत नाहींत. शेणव्यांत मुख्य भेद दोन. मुंबईकर किंवा गोंवेकर व वाडीकर किंवा वेंगुर्लेकर. पहिल्या भेदास मत्स्य चालतात. चतुष्पाद् व शिकार या दोहोंपैकीं त्यांस एकही चालत नाहीं. तीं दोन्हीं चालतात दुसऱ्या वर्गांतील असतात त्यांस मात्र. कृष्णाजी अनंत सभासदानेंही शिवच्छत्रपतीच्या चरित्रांत शेणव्यांस 'मत्स्याहारी' ह्मटलें आहे. २०–चित्पावन भज्यांचीं दुकानें घालणें, खाणावळी घालणें, पाणी भरणें, शागिर्दी करणें वगैरे हलकीं कामें करितात

री असा पोकळ अभिमान कां?) १२–लोकहितवादी ह्मणतात. (७ व्या मुद्याच्या उत्तरावरील टीप पहा. दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर नाहीं.) १३–गंगो मंगाजी शिवाजीचा मंत्री शेणवी होता. (गंगो मंगाजी **कांहीं दिवस** मंत्री होता खरा. पण तो वंशपरंपरागत व शेणवी कशावरून? रामभाऊ त्यास शेणवीपणाचा ठिळा लावितात ह्मणून कीं काय?) १४–(रामभाऊ कबूल करितात. फूट पाडण्याचें कारण रामभाऊंनीं दिलें आहे तें खरें असेल किंवा खोटें असेल. रामचंद्र बाबा गुणनिधान नव्हता हें सिद्ध झालें व रा. रा. भा. चें काम झालें.) १५–(नीट उत्तर नाहीं. 'शेणवी बोरा' वर रा. रा. भा. चा

त्याप्रमाणेंच भालवलीकर, कुडाळदेसकर वगैरे शेणवी भज्यांचीं दुकानें घालतात, खाणावळी घालतात, पाणी भरतात व शागिर्थी करितात. जर तें तें काम कित्येक करितात ह्मणून सर्व चित्पावन हलकट होतात तर तींच किंवा त्यांच्या सारखीं भटारखाना घालणें वगैरे हलकीं कामें कित्येक शेणवी करितात ह्मणून सर्व शेणवी हलकट झाले पाहिजेत.
२१—इतर जातींच्या लोकांच्या घरीं स्वैंपाक वगैरे करिण्यास रहाणें शेणव्यांस आवडत नाहीं हें रामभाऊंचें ह्मणणें पोकळ. कोणत्याही इतर जातीचे लोक यांस चित्पावन वगैरे महाराष्ट्र ब्राह्मणांच्यां बरोबर लेखींत नाहींत. तेव्हां सहजच ते शेणव्यांस आपल्या घरीं मुळींच विश्वास नाहीं. शेणव्यांनीं शेणव्यांला आकाशावर चढविणें साहजिक आहे. स्वतंत्र लेख ह्मणजे शेणव्यांचा हात ज्यांत मुळींच नाहीं असे शेणव्यांच्या संबंधाचे लेख रा. रा. भा. ला पाहिजेत. १६—गोडबोले यांचा कोश. ( गोडबोल्यांची माहिती स्वतंत्र नव्हे. रामभाऊंसारखे शेणवी ह्मणतात तें संभाव्यासंभाव्यत्वचा विचार न करितां त्यांनीं आपल्या लेखांत दाखल केलेलें. १७—गोडबोल्यांचाच आधार. ( पण गोडबोलेच ह्मणतात कीं कित्येकांच्या मतें तो शेणवी होता. 'कित्येकांच्या' ह्मणजे रामभाऊ वगैरे शेणव्यांच्या?)
१८—सरस्वतीमंडलाचा (पृ. ५९ ) हवाला. (तर 'जशास तसें' पृ० १७ व १८ पहा.

ठेवण्यास राजी नसतात व शेणव्यांच्या हातचें पाणी उडालें तर शिवाशिव झाली समजतात. २२—महाराष्ट्र ब्राह्मणांस आपणांहून हलके समजून शेणवी आपल्या घरीं पाणी आणणें वगैरे काम करण्यास ठेवीत नाहींत हा रामभाऊंचा लेख खोटा. शेणव्यांच्या घरीं ब्राणको-ळ्याच्या हातचें पाणी स्नाना-स वगैरे चालतें व स्वैपाकांत प्राय: मत्स्यांची आहुति असल्या शिवाय अग्निहोत्राचें हवन होत नाहीं ह्मणून महाराष्ट्र ब्राह्मण यांच्या घरीं चाकरी करण्यांस खुशी नसतात. तशांत मत्स्य वगैरे आपण खातों हें महाराष्ट्र ब्राह्मणांनीं जाणणें शेणव्यांस इष्ट नसतें. ह्मणून शेणवी महाराष्ट्र ब्राह्मणांस आपल्या घरीं स्वैपाक वगैरे करिण्यास

'राजन्' व 'आर्य' यांचा 'राजार्य' असा समास होऊन त्याचा 'रण्णाजी' व 'राणोजी' अपभ्रंश होतो तसाच 'शर्मन्, व 'आर्य' यांचा समास होऊन त्यांचा 'शेणवी' अपभ्रंश होतो असें रामभाऊ ह्मणतात. पण 'राजार्य' शब्द संस्कृतांत आहे कोठें? क्षणभर कल्पना केली कीं तो आहे. ह्मणून तो काय 'राजन्' + आर्य' मिळून झाला? 'राजन् + आर्य' हा समास कीं संधि? 'राणोजी' हा शब्द पाहिला असतां 'राजन्' शब्दाचा अपभ्रंश 'राणा' किंवा 'राणू' याला बहुमानार्थी 'जी' शब्द लागून झालेला. पण एका विलक्षण व्युत्पत्तीचा दुराग्रह धरला ह्मणजे सर्वत्र अशीच घाण व्हायाची. 'अजी' व 'जी'

ठेवीत नाहींत व महाराष्ट्र ब्राह्मणही त्याचमुळें शेणव्यांच्या घरीं रहाण्यास खुशी नाहींत हें वास्तविक कारण. २३–एक दोन चित्पावन पुण्यांत हजाम झाले व हजामाचा धंदा हलकेपणा आणणारा असें रामभाऊ ह्मणतात. पण हा लेख लिहून चित्पावनांच्या जातीस उणेपणा आणण्याविषयीं यत्न करिताना एका नांवाजलेल्या शेणवी जातीच्या गृहस्थानें हिंदुमात्रास निषिद्ध गोमांस नांवाचा पदार्थ आगबोटीवर पुरविण्याचा मक्ता घेतला होता व दुसऱ्यानें काळबादेवीवर चर्मी जोडे आपल्या दुकानांत विकायास ठेविले होते हें रामभाऊंनीं विसरायाचें नव्हतें. चित्पावनांचा द्वेष जो पुरुष करीत नसेल तो हे तरी ‘आर्य’ शद्वाचे अपभ्रंश कसे? संवुद्धिशद्व व मूलशद्व हे काय पर्याय? रा. रा. भा. तर संबोधनाच्या एकवचनास संबुद्धि समजतो. हा सर्व रामभाऊंचा प्रयास रा. रा. भा. च्या समजुती पलीकडे आहे. जर ‘आपय, करय’ वगैरे कित्येक णिजंतें संस्कृत भाषेप्रमाणें ‘अय’ लागून होतात ह्मणून गोमांतकी भाषा मराठीपेक्षां अधिक प्राचीन व संस्कृताशीं तिचा संबंध अधिक तर पुढील शब्दाच्या लिंगाची पर्वा न करिणारा, व पाणिनीनें आपल्या व्याकरणांत दाखल केलेला षष्ठ्येक वचनाचा ‘अस्’ (ङस्) लावून व ‘अ’ चा लोप झाला हें दाखविण्यासाठीं ‘अपास्ट्रफी’ घालून षष्ठीचें एकवचन करिणारी

वरील त्यांच्याविषयीं माहिती लिहिणारच नाहीं, व कदाचित् निष्पक्षपाती ह्मणून जर ती त्यानें लिहिली तर शेणव्यांविषयींची दुसरी माहिती लिहिल्या शिवाय त्यास चैनच पडायाचें नाहीं. २४—कोणींही शेणव्यानें राजापासून आपणास जहागीर करून घेतली नाहीं ह्मणून शेणवी आपमतलबी नव्हते हें रामभाऊंचें ह्मणणें निःसार. अशी गोष्ट घडण्यास जितकी सत्ता हातांत असली पाहिजे तितकी सत्ता आज पर्यंत एकाही शेणव्याच्या हातीं आलेली नाहीं. रामचंद्रबाबाच्या हातांत थोडी सत्ता येतांच त्यानें गुण उधळले नाहींत असें नाहीं. २५—जिवबादादा, लखबा दादा असें कित्येक शेणव्यांस ह्मणत

इंग्रजी भाषा पुढील शब्दाच्या लिंगाप्रमाणें 'चो, चा' किंवा 'चें' लावून षष्ठीचें एकवचन होऊं देणाऱ्या गोमांतकी भाषेपेक्षां अधिक प्राचीन व संस्कृताशीं अधिक संबद्ध ह्मटली पाहिजे. 'आपवणें' वगैरे कित्येक धातू गोमांतकींत ज्या अर्थी वापरतात त्याच अर्थी साष्टी तालुक्यांत मालाड वगैरे ठिकाणीं रहाणाऱ्या पांचकळशांच्या बोलींतही येतात. ह्मणून काय त्यांची भाषा संस्कृताशीं अधिक संबद्ध होऊन ते साक्षाद् ऋषिसंतति होतात? इतक्यावरून जर ऋषिसंततित्व येईल तर पांचकळशांचे शेणवी किंवा शेणव्यांचे पांचकळशी सहज वंशज किंवा पूर्वज ठरतील. 'उदक' हा संस्कृत जलवाचक शब्द गो-

ह्मणून पेशवे त्यांस बापाप्रमाणें मानीत हें ह्मणणें पोकळ. जे रामभाऊ किंवा भाऊसाहेब ह्मणतात ते सर्व रामभाऊंस वडील बंधु समजतात असें नाहीं. उलट ' दादा बाबा ' असले शब्द महाराष्ट्र ब्राह्मण शूद्रादिकांचा बहुमान करितानां वापरतात ह्मणून ' दादा, बाबा ' वगैरे शब्द लावीत त्यापक्षीं महाराष्ट्र ब्राह्मणांस शेणव्यांचें ब्राह्मणत्व फारसें कबूल नव्हतें इतकें मात्र ' दादा, बाबा ' या शब्दांवरून सिद्ध होण्यास वेळ लागणार नाहीं.

२६—शेणवी जर सारस्वत खरें तर ते दुष्काळामुळें किंवा इतर कारणानें पारशी गुजराथेंत आले त्याप्रमाणें आले असावे. मयूरवर्मा नांवाचा कदंब वंशांतील राजा होता त्यानें गौड देमांतर्कांत अत्रिकृतच्या अविकृत वापरतात ह्मणून रामभाऊ गोमांतकी भाषा अतिप्राचीन ठरवितात. सर्व सृष्टीचा कर्ता जो परमात्मा जो सर्वशक्ति व जगदुत्पादक व जगच्चालक त्यास राजापुर प्रांतांतील ह्मार ' पुरुख ' शब्दानें ओळखतात. ' पुरुष ' हा परमात्म्याचा वाचक शब्द उपनिषदांतच फार येतो. तेव्हां ह्मारही उपनिषत्काळापेक्षां प्राचीन होतील व त्यांची भाषा अस्सल संस्कृताशीं अधिक संनद्ध होईल. इतकेंच नव्हे तर ' सहस्रशीर्खा पुरुख: ' प्रमाणें ' ष ' चा ' ख ' उच्चार करितात ह्मणून यजुर्वेदीही ठरवून ह्मारांस आपल्या ऋग्वेद्यांच्या पंक्तीचा लाभ करून रामभाऊ देतीलच देतील.

शांतून कांहीं ब्राह्मणांस आपल्या राज्यांत आणिलें असें सह्याद्रिखंडांत लिहिलें आहे पण त्यांत कांहीं जीव नाहीं. दुर्भिक्षादिकामुळें ते आले व ब्राह्मण ह्मणून ह्मणाले तेव्हां मयूरवर्म्यानें सहजच आश्रय दिला हें ह्मणणें अधिक संभाव्य. असे जर उचलून शेणवी आलेले तर त्यांच्या ब्राह्मणत्वाची शंका महाराष्ट्र ब्राह्मणांस येणें साहजिक आहे. शेणव्यांनीं त्यामुळें चिडणें बरोबर नाहीं. शेणवी हे खरोखर पाहिले असतां द्रविडच असावेत. देशस्थादिकांनीं जैनांच्या सहवासानें मत्स्यादिक सोडलें व शेणव्यांनीं सोडलें नाहीं. ह्मणून आपणांबरोबर ब्राह्मण यांस लेखीतनासे झाले, व त्यामुळें हळू हळू इतर

‘उज्ज्वलते’ ह्मणजे दीप्यते’ हें क्रियापद वेदांत येतें ह्मणून ‘उजो’ हा अग्निवाचक गोमांतकींतील शब्द व त्याचा अर्थ वेदांच्या वेळचा! तर मग ‘वात’ हें नाम व ‘डी’ हा धातु वेदांत येतो व ‘अप्’ ही वेदांतील देवता सुप्रसिद्ध असून ‘हर’ शब्दही वेदांत आढळतो, ह्मणून ‘वावडी’ (‘वात’ शब्दाचा हर्णाईकडील ब्राह्मे मुसलमान ‘वाव’ किंवा ‘वाय’ असा अपभ्रंश करितात हा एक त्यास बळकट आधार) व ‘पोहऱ्या’ (अपोहर) हे दोनही मराठी शब्द व त्यांचे अर्थ हें सर्व कांहीं थेट वेदांच्या वेळचें झालें! ‘वावडी’ हा शब्द तर अगदीं मुलांबाळांच्या तोंडीं असतो! ‘पोहऱ्या’ हा तर किती

लोकांचीही तशीच प्रवृत्ति झाली हें ह्मणणें अधिक संभाव्य. २७—'नाना शेठ' असा 'शेठ' शब्द पुनः पुनः उच्चारून त्याचा अनेकवार एकवचनांत प्रयोग केला आहे तें बरोबर नाहीं. नानासाहेब असा प्रयोग करून अनेक वचनाचा आदर केला असता तर फार चांगलें झालें असतें. २८—जर रामभाऊंनीं निष्पक्षपातानें देशस्थांचे वर्णन केलें असतें तर प्रल्हाद निराजी सारखा हिरा त्यांत चमकल्याशिवाय रहाता ना. २९—इंग्रजी कलांकडे त्या वेळीं लक्ष गेलें नाहीं ह्मणून नाना फडणीस शहाणा नव्हता हा रामभाऊंचा केवळ कुत्सितपणा. ३०—'अधिकार हातीं येतांच आपल्या जातींतील लोकांस उपयोगाचा पदार्थ या संसारांत आहे बरें ! किती प्राचीन ही आमची मराठी भाषा!!! सारांश भाषेच्या तत्वाचा विचार करितांना रामभाऊंनीं जो लेख लिहिला आहे तो केवळ मारून कुटून कांहीं तरी लिहावें ह्मणून लिहिलेला दिसतो. त्यांत अर्थ मुळींच नाहीं ). १९—( नीट उत्तर नाहीं. तरी महाजनवाडीच्या प्रकरणामुळें मत्स्यभक्षण रामभाऊंनीं बरेंच कबूल केलेलें दिसतें ही एक आनंदाची गोष्ट आहे). २०—महाराष्ट्र ब्राह्मणांनीं क्रिश्चियनांकडचे पांव खाऊं नयेत ह्मणून शेणव्यांनीं सोंवळीं पांवांची दुकानें घातलीं!!! (जे **शेणवी** 'मेसन्स' च्या मेजवानींत व हाटेलांत जातात त्याच्यासाठीं सोंवळीं

वाढविण्याकडेस चित्पावनांचे लक्ष फार' हें रामभाऊंचें ह्मणणें खोटें. हा आरोप हल्लींच्या शेणव्यांवर जितका करितां येईल तितका पूर्वींच्या किंवा हल्लींच्या चित्पावनांवर करितां येत नाहीं. ३१—जातिभेद कायम राखून व त्यास अनुसरून जर प्रत्येक जात चालेल तर परिणाम सुंदर होईल हें रामभाऊंचें ह्मणणें दूर दृष्टीचें नव्हे. जातिभेद जितका राहेल व प्रत्येक जात जितकी जातिभेदास आश्रय देऊन चालेल तितकी महाराष्ट्र देशाची अधिक धूळधाणी होईल. ३२—आर्जव शक्ति चित्पावनांत अधिक आहे असें रामभाऊ ह्मणतात तें खोटें. आर्जवशक्ति हल्लींच्या नांवाजलेल्या चित्पावनांत सर्व प्रकारच्या मांसांचीं व महामांसाचीं दुकानें घालण्यास आपल्या जातींतील शेणव्यांस आतां रामभाऊ शिफारस करतीलच. दुसऱ्याच्या घराची व्यवस्था लाविण्याच्या पूर्वीं स्वतःच्याच घराची नीट व्यवस्था लावणें अधिक श्रेयस्कर होय). २१—( नीट उत्तर नाहीं ). २२—( नीट उत्तर नाहीं. तरी वाणकोळ्याचें पाणी चालतें हें रामभाऊ कबूल करितात त्यापक्षीं रा. रा. भा. चें बरेंच काम झालें). २३—गोमांसाविषयींचा लेख रामभाऊ कबूल करितात. चर्मी जोड्याविषयीं ब्राह्मणांमध्यें शोध करण्याचें टाकून जर शेणव्यांमध्यें किंवा त्यांच्याच 'युनियन क्लब' मध्यें शोध चालविला असता तर निःसंशय

तर नाहींच. थोडी बहुत जरी कोठें असली तरी त्यांच्याही पेक्षां शेणव्यांत अधिक आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

३३–जात्यभिमानशून्यता व निस्पृहपणा हीं दोन हल्लींच्या चित्पावनांत जितकीं दिसतात तितकीं शेणव्यांत दिसत नाहींत. ३४–शेणव्यांची विवाहपद्धति आहे तीस ब्राह्म विवाह ह्मणतां येत नाहीं कारण **मुलाचा विक्रय** तींत होतो. पैसा घेऊन मुलगी देणें हा 'आसुर' विवाह शास्त्रांत अष्टविध विवाहांत सांगितला आहे. पण हुंड्याच्या व सोन्याच्या नांवानें किंमत ठरवून मुलाचा पैसा घेणें हा विवाहाचा मार्ग शास्त्रें झालीं त्या वेळेस नव्हता. तो जर त्या वेळीं असता तर त्यास नांव रामभाऊंचा श्रम सफळ झाला असता). २४–(उत्तर नाहीं). २५–(नीट उत्तर नाहीं. मंत्र्यांस 'पंत' लावितात. पण या 'पंता' चा ब्राह्मणत्वाबरोबर संबंध नाहीं. प्रधानकी बरोबर हें 'पंत' पद आपो आप येतें. 'जिवबा दादा' स 'दादा' ह्मणत ह्मणून पेशवे त्यास आपला बाप समजत हें रामभाऊंचें अनुमान रा. रा. भा. स खोटें पाडायाचें होतें. तें तर काम झालेंच). २६–(नीट उत्तर नाहीं. रामभाऊ आपल्या भाषेला 'सारस्वती' शब्द लावितात, ती चूक आहे. शेणव्यांची भाषा आहे ती एका शेणवी जातीचीच नव्हे, तर गोंवाप्रांतांत जे **सोनार, भंडारी** वगैरे आहेत त्यांचीही भाषा तीच. भा-

मिळून अष्टविध विवाह आहे तो नवविध झाला असता. मुलीचे पैसे घेण्यांत जितका अधमपणा तितकाच किंबहुना त्याच्या पेक्षांही अधिक लहानपणीं मुलीचा नवरा वारला असतां तिचा पुनर्विवाह न करिण्यांत आहे. ह्मातारपणीं लग्न केल्याचीं उदाहरणें जशीं चित्पावनांत तशीं शेणव्यांतही देतां येतात.

३५—चित्पावन शब्द गाळून टाकण्याविषयीं चित्पावनांनीं प्रयत्न केला असें ह्मणण्यास प्रमाण नाहीं. शेणवी गाळून सारस्वत ह्मणविण्यास शेणवी भगीरथ प्रयत्न करितात हें ह्मणणें अधिक शोभलें असतें. कोंकणस्थ किंवा कोंकण्ये हा शब्द देशस्थांनीं चित्पावनांस लाविलेला दि- [illegible]नें फिरले, जातिपरत्वानें फिरत नाहीं. गोमांतकांतील सोनारादिकांची जी बोली तीच शेणव्यांची. तेव्हां शेणवी द्रविडच असले पाहिजेत. मग ते उत्तम जाती पैकीं असोत मध्यम जाती पैकीं असोत किंवा कनिष्ठ जातीपैकीं असोत. रामभाऊंनीं त्यांचा संबंध गौडांबरोबरच काय, पण अफगाणांबरोबर व मोंगलांबरोबरही पाहिजे तर खुशाल लावावा. चित्पावनांचा कन्यावाचक ‘चेडी’ हा ‘चलो’ शब्दाचें ‘चडी’ किंवा ‘चली’ हें स्त्रीलिंगी रूप. शेणव्यांचा दासीवाचक ‘चेडी’ हा ‘चेटी’ शब्दाचा अपभ्रंश. पण जात्यभिमानाचें पित्त खवळलें ह्मणजे श्वेत तितकें पीत दिसायाचेंच. तेव्हां रामभा-

सतां. कोंकणस्थ शब्दांत कोंकणांतील इतर जातींचा समावेश होत नाहीं यांत चित्पावनांचे कांहीं कृत्रिम नाहीं. चित्तपावन शब्द ओढाताणीचा कसा? भटारखाना वगैरे चालविणाऱ्या मंडळीस जर **सारस्वतांत** घालतां येतें, तर शागिर्दी वगैरे करणाऱ्या मंडळीस **चित्तपावनांत** घालतां आलेंच पाहिजे.

२६–देशस्थां जवळ सह्याद्रि खंड वगैरे असतें ह्मणून तें त्यांचें असावें वगैरे रामभाऊंचा सर्व लेख पोकळ. सह्याद्रिखंडाच्या प्रती वेदाप्रमाणें जपून ठेवणारी मंडळी शेणव्यांत अधिक सांपडेल, व तें छापविण्याच्या कामांतही मदत होती फार शेणव्यांची. तेव्हां तें शेणव्यांचेंच असलें पाहिजे. ऊंचा नाइलाज आहे).

२७–(चूक बरीच कबूल केली आहे. गुजराथी व पारशी 'शेठ' शब्द नाना साहेबांस लावीत ह्मणून मराठ्यानें त्यांस लावणें अयोग्य; कारण 'शेठ' शब्दाचा प्रयोग केव्हां करावा हें मराठ्यास समजतें तसें जो मराठा नव्हे त्यास समजत नाहीं. तशांत सरजमशेटजी वगैरे मोठ्या लोकांनीं नानासाहेबांस विशेष सलगी असल्यामुळें 'नाना शेठ' ह्मटलें तरी इतरानें तसें ह्मणणें बरोबर नाहीं. शेट डोसाभाई कडाका यांस सरजमशेटजीच्या घरांत 'डोसा' ह्मणतात असें ऐकितों. पण कोणी इतर पारशी किंवा मराठा त्यांस 'डोसा' ह्मणेल काय? नानासाहेबांचें

३७–ग्रीक y चा उच्चार 'उ' प्रमाणें असतो. तेव्हां Ægyptus या शद्बाचा खरा उच्चार 'एगुप्तस्'. हल्लीं या लोकांस Copt ह्मणतात. 'कॉप्ट' हें Ægyptus या शब्दाचेंच खरें तद्देशीय रूप. Ægypt शब्दांतील g चा उच्चार 'ज' करितात ती इंग्रज लोकांची चूक. तशांत जनपदवाचक शब्दास 'मतुप्' प्रत्यय संस्कृतांत लागत नाहीं. तेव्हां 'चित्पावन' ह्मणजे 'जिप्तवान्' वगैरे रामभाऊंचें सर्व व्याख्यान निःसार. ३८–माधवाच्या कल्पलतिकेंत चुका आहेत तितक्याच किंबहुना त्यांच्याही पेक्षां अधिक सह्याद्रि खंडांत आहेत. ३९–शेणव्यांचे वंशज कऱ्हाडे असें अनुमा-

चरित्र लिहिण्यास एका कऱ्हाड्यानेंच आरंभ केला आहे; व तें तोच संपविण्यास समर्थ आहे व संपवील. जर एखाद्या शेणव्यानें आंत विघ्न केलें व त्यामुळें तें त्या कऱ्हाड्या जवळून गेलें तर तेथें त्याचा नाइलाज आहे. बंडवाल्याचें नांव नानासाहेब ह्मणून आपण 'नाना' साहेब शब्द नाना शंकरशेट यांस लाविला नाहीं ही कोटि मात्र रामभाऊंची दांडगी खरी. सरस्वती मंडलांतील 'नानाशेठ' आलेला 'प्यारा' व 'जशास तशांत' त्यावर आलेली टीका हीं दोनही वाचकानें अवश्य वाचून पहावीं व हवें असल्यास व सवड सांपडल्यास एखाद्या दैवज्ञासही विचारानें ह्मणजे सर्व संशय निवृत्त

न काढण्यास मुळींच आधार नाहीं. **उलट शेणवी कऱ्हाड्यांचे वंशज समजण्यास कांहीं तरी आधार आहे.** ४०—माधवाची उलटी सुलटी करून पुनः कऱ्हाड्यांची निंदा कर्तव्य असली ह्मणजे त्यास थोडेंसें प्रामाण्य देणें हें कुत्सितपणाचें काम. जर कऱ्हाड्यांविषयीं प्रवाद आहेत त्यांस कांहीं तरी आधार असावा तर मत्स्यभक्षण केल्यामुळें शेणव्यांचीं तीन कर्मं गळलीं हा लेखही निराधार नसावा. ४१—देशस्थांचा व कऱ्हाड्यांचा शरीरसंबंध होत नाहीं हा रामभाऊंचा लेख निराधार. चित्पावनांचा व कऱ्हाड्यांचाही पुष्कळ ठिकाणीं शरीरसंबंध झालेला आहे. ४२—बाळ मंगेश वागळे हे **प्रथम** वाहोईल). ( २८, २९, ३०, ३१, ३२, व ३३ यांपैकीं बरेच मुद्दे रामभाऊंस पुष्कळ अंशी कबूल करावे लागले आहेत. नीळकंठरावादिकांची उदाहरणें दिलीं तीं व्यक्तींवरून जातीची परीक्षा स्थालीपुलाकन्यायानें लागलीच करितां येत्ये ह्मणून दिलेलीं. व्यापारी हफीसांत शेणवी फार कां व ते दुसऱ्या जातीच्या पुरुषाचा शिरकाव कां होऊं देत नाहींत वगैरेचीं कांहीं कारणें रामभाऊंनीं दिलीं आहेत तीं 'शेणवी मत्स्य मांस खात नाहींत' वगैरे जे लेख सरस्वतीमंडलांत घातले आहेत त्यांच्याच तोलीचीं आहेत. 'भ्रमनिरासा' ची प्रत कशी तरी पैदा करून ती वाचकानें जरूर वाचावी. डा० भाऊ मोटे

लिस्टर हें आलें. त्याप्रमाणें-च जर रामभाऊ निष्पक्ष-पाती खरे तर श्रीपाद बाबाजी ठाकूर हे **प्रथम** सिव्हिल सर्वंट व अण्णा कुंटे हे **प्रथम** एम्. डी. हें आल्याशिवाय रहातें ना. ४३—हरिपंत पंडित नाग-पुरकर कऱ्हाडे, महाराष्ट्र ब्राह्मणांचा आपापसांत श-रीर संबंध होत नाहीं, वगैरे मजकूर मुळींच शोध न करितां रामभाऊंनीं ठिक-ठिकाणीं ठोकून दिला आहे. ४४—रामभाऊंनीं एक शेणवी जातीचेंच वर्णन करून तिचें ब्राह्मण-त्व सिद्ध करायाचें होतें. ह्मणजे 'परिणाम फारच सुंदर' झाला असता. असा कडू झाला नसता. ४५—अनंत पै प्रभूचें नांव ज्यांत आलें आहे त्या शिलाले-

गृहस्थ होते. पण त्यांच्या नांवावर जी शाळा चालत आहे ती तशी चालत्ये त्या-चें मुख्य कारण रावसाहेब मंडलिक होत. रावसाहेब डा. भाऊ यांस बापाप्रमाणें मानीत असा कांहीं तरी लेख रामभाऊ पहिल्यानें ठोकून देतात, व रा. रा. भा. जेव्हां आधार विचार-तो तेव्हां रावसाहेब मंडलि-कांस विचारावें असा राम-भाऊ जबाब देतात !!! सारांश पुष्कळ ठिकाणीं आधार विचारला आहे, त्याचें 'तुह्मींच चौकशी करा' हें रामभाऊंचें मोठें मासलेदार उत्तर!!! पु-ण्यांतील मुलींच्या शाळेवर राव बहादूर पंडितांचे मोठे उपकार आहेत यांत संशय नाहीं. पण त्यांत चित्पा-वनांचा व कऱ्हाड्यांचा मु-

त्याचा नीट मागमूस लागत नाहीं. बनावट प्राचीन लेख बरेच आढळलेले आहेत. तेव्हां तोही कदाचित् बनावट असेल. ४६—मह्माळू वगैरे नांवें शेणव्यांत असतात तशींच कऱ्हाड्यांत असतात. ह्मणून तितक्यावरून रामभाऊंनीं दिलेल्या ताम्रलेखांतील अग्रहार शेणव्यांचे हें मुळींच सिद्ध न होतां जेथें ते ताम्र लेख सांपडले तेथें कऱ्हाड्यांची पुष्कळ वसति असल्यामुळें ते कऱ्हाड्यांचेच असण्याचा संभव अधिक. रामभाऊंनीं ते अग्रहार शेणव्यांचे हें सिद्ध करण्यास जी युक्ति योजिली आहे त्या युक्तीचा आश्रय केल्यास शिंपीच नव्हत तर बोहरी (मुसलमान) ही ब्राह्मण होतील.

---

ळींच हात नाहीं, असें जर रामभाऊ समजत असतील तर मोठेंच अज्ञान किंवा दुराग्रह. अगरकर व टिळक यांच्या संबंधानें 'भयंकर नीच आरोप आणणारांची योग्यता आह्मीं काय बरें समजावी' असें या वेळीं ह्मणणारे रामभाऊच 'युनियन क्लब' नें तुरुंगांतून सुटतांच अगरकर व टिळक यांस बहुमानपूर्वक पानसुपारीला बोलाविलें त्या खटपटींत अध्वर्यु होते. त्या वेळीं माधवराव बर्व्यांवर आणलेला आरोप रामभाऊंस 'भयंकर नीच' दिसला नाहीं. पण हल्लीं तो तसा दिसतो. अशी थोडक्याच काळांत विषमदृष्टि होण्याचें कारण 'केसरी' कार व 'मराठा' कार यांनीं सरस्वतीमंडलाची नोटिस घे-

यांप्रमाणें **‘ जशास तशा ’** तील ४६ मुख्य मुद्दे व त्यांस ‘ भ्रमनिरासां ’ त दिलेलीं उत्तरें त्या उत्तरांवर लिहिण्यासारखें होतें तें थोडक्यांत लिहून निष्पक्षपातानें वाचकांस सादर केलीं आहेत. ‘कऱ्हाड्यांच्या पंक्तीस बसणें प्रशस्त न वाटल्यामुळें एका शेणव्याच्या घरीं जमलेले शेणवी उठून चालते झाले ’ या मतलबाचा शुद्ध जात्यभिमानानें **सर्वथा खोटा** लेख त्याचा खोटेपणा सिद्ध झाला असतांही जाणून बुजून मुद्दाम आपल्या पुस्तकांत दाखल करिणाऱ्या रामभाऊंची छाती रा. रा. भा. स नाहीं. या स्थलीं व ‘शेंकडों चित्पावनांला शेणव्यांनीं नोकऱ्या लावून दिल्या आहेत ’ असल्या स्थलीं ऊन स्तुति केली नाहीं हेंच नसेलना ? रा. रा. भा. सरस्वतीमंडलाचें खरें स्वरूप लोकांस स्पष्ट करून दाखवितो ह्मणून त्याच्यावर अपशब्दांचा भडिमार, व ‘ केसरी ’ कार वगैरे पत्रकर्ते रामभाऊंची बूज जाऊं नये एतदर्थ तोंड बंद करितात ह्मणून त्यांच्यावरही अपशब्दांचा भडिमार ! ! ! ३०—( शेणव्यांत विवाह होतो तो ब्राह्म विवाह नव्हे व तो अष्टविध विवाहांत येत नाहीं ह्मणून अपूर्व होय, व हुंडा वगैरे घेण्याची चाल शेणव्यांत विशेष आहे तेव्हां नरमांसविक्रय आहेच हें रा. रा. भा. चें ह्मणणें. रामभाऊंचें उत्तर यथार्थ नाहीं. तें वाचकानें जरूर वाचून पहावें ). ३५—(नीट उत्तर नाहीं. ‘पतितपावन’

नांवें जरूर दाखल केलीं पाहिजे होतीं. पण तसें न करितां केवळ पोकळ लेख लिहून रामभाऊ कित्येक आरोपांची शुद्ध उडवा उडव करूं पहात आहेत, हें त्यांच्या सुज्ञपणास शोभत नाहीं. रामभाऊच ह्मणतात कीं, बनावट ताम्रलेख पुष्कळ आहेत. कऱ्हाडे व चित्पावन यांनीं जर शेणवी त्रिकर्मी हें सिद्ध करण्यासाठीं बनावट लेख केले असें रामभाऊ वगैरे शेणवी ह्मणतात, तर शेणव्यांनींही आपलें त्रिकर्मित्व छपवून षट्कर्मित्व स्थापण्यास बनावट केलेले असतीलच असें ह्मणण्यास कऱ्हाड्यांस व चित्पावनांस जागा आहे. जर चित्पावन व कऱ्हाडे यांमध्यें कित्येक लुच्चे आहेत, तर शेणव्यांमध्येंही ते असले शब्दांत 'पावन' शब्दाचा अर्थ पवित्र नाहीं ह्मणून 'चित्तपावन' शब्दांतही 'पावन' शब्दाचा अर्थ पवित्र नाहीं; ही रामभाऊंची कोटि फारच जाड. 'पतितपावन' शब्दांत 'पावन' शब्दाचा अर्थ 'पवित्र करणें' नव्हे तर कोणता? क्षणभर समजा कीं 'पतितपावन' शब्दाचा अर्थ पतितांस 'पवित्र करणारा' नव्हे ह्मणून काय 'चित्तपावन' शब्दांत तो तसा नाहीं असें ह्मणतां येईल? 'रामचंद्र' शब्दांत 'चंद्र' शब्दाचा अर्थ 'चंद्र' नव्हे ह्मणून काय 'मुखचंद्र' शब्दांतही 'चंद्र' शब्द चंद्राचा वाचक होत नाहीं? 'पतितपावन' शब्दाचा विग्रह व अर्थ रामभाऊंस समजूं नये हें एक मोठें आश्चर्य.

पाहिजेत. **सर्व शेणवी कांहीं सत्याचें माहेर नव्हत.** जर 'आज्ञापत्र' खोटें ठरलें तर रा. रा. भा. तें खोटेंच ह्मणेल; रामभाऊंप्रमाणें उडवा उडव करणार नाहीं. पण तें खरें कीं खोटें याचा विचार करण्याचें काम **'वार्ताहर'** कर्त्याचें आहे. जर तें खोटें ठरलें तर **'जशांस तशां' तील शेवटचें एक वाक्य मात्र रद्द** समजावें. बाकी सर्व रामभाऊंच्या पोकळ लेखाच्या संबंधानें 'जशास तशां' तील काम मुद्देसूद झालें आहे. रामभाऊंनीं तापवून सुलाखून व कोडताच्या कसास लावून खात्री करून घ्यावी. हा उपाय अनिष्ट दिसल्यास स्वत:सच लघुत्व आणणारा लेखक्रम सोडून द्यावा व तीन महा-

'पतितं पुनातीति पतितस्य वा पावन:=पतितपावन:' व 'पुनातीति पावन:' यांतून पाहिजे तो विग्रह घ्यावा. 'चित्तपावन' शब्द 'पतितपावन' शब्दाप्रमाणें झाला असें समजण्यास हरकत कोणती?) ३६— अगदीं तिऱ्हाईत डा. वुइल्सन ह्मणतात कीं सह्याद्रिखंड देशस्थानें रचलें असावें. (डा. वुइल्सन व लोकहितवादी हे एकाच वर्गांतील. रा. रा. भा. कऱ्हाड्याचेंच हें ह्मणणें आहे असें नाहीं. मुंबईतील वर्तमान पत्रांचे शेणवी एडिटर व नांवाजलेले शेणवी बारिस्टर यांचेंहीं मत असेंच आहे असें ऐकितों. डा. वुइल्सन ह्मणजे एक great humbug. रामभाऊ ज्यास अगदीं तिऱ्हाईत समज-

राष्ट्र ब्राह्मण व तीन शेणवी असे सहा पंच व कायस्थ किंवा असल्याच दुसऱ्या जातीचा मुख्य पंच नेमून त्यांच्या मार्फत सरस्वतीमंडळांतील लेख मुद्देसूद कीं 'जशास तशां' तील लेख मुद्देसूद हें ठरवून रामभाऊंनीं महाराष्ट्र लोकांस सादर करावें यांतच अब्रू आहे.

---

## उपसंहार.

आतां अखेरीस रामभाऊंस इतकें कळविणें योग्य दिसतें कीं, रा. रा. भा. च्या घराण्यावर कित्येक शेणव्यांचेच नव्हत तर प्रभु जाती पैकीं व दैवज्ञ जातीपैकीं कित्येक सुप्रसिद्ध पुरुषांचेही पुष्कळ उपकार झालेले आहेत. प्रोफेसर भांडारकरांसारख्या विद्वान् पुरुषावर व रामभाऊंसारख्या नांवाजतात तोच डा. वुइल्सन किंवा तसाच दुसरा एखादा पाद्री किंवा सुप्रसिद्ध इंग्रज जर शेणवी मत्स्यमांस खातात व त्रिकर्मी ब्राह्मण आहेत असें ह्मणेल तर त्याचा तिऱ्हाईतपणा रामभाऊंस मान्य होईल काय? पैसे मिळाले ह्मणून गणेश शास्त्रयांनीं सह्याद्रिखंडाचे प्रूफ तपासले व दणाईत शास्त्री मध्येंच पोबारा करून गेल्यामुळें दानाप्रमाणें 'कॉपी' सुधरून व शुद्ध करून डा. कुन्हा यांस दिली. डा. कुन्हा हेही मूळचे आपल्या जातीचे ह्मणजे शेणवी हें रामभाऊ कबूल करितातच. दणाईत शास्त्री शेणवी व केणी शास्त्री शेणवी. पोथ्या आणून प्रत तयार केली दोन शेणवी शा-

लेल्या मराठी ग्रंथकारावर व विविधज्ञानविस्ताराच्या जनकावर, महाराष्ट्र ब्राह्मणांचे व त्यांतही कऱ्हाड्यांचें मुळींच उपकार झालेले नाहींत कीं काय ? **देव** (चित्पावन) पदारविंदीं मिलिंदायमानता आली तेव्हां भांडारकरांस काव्यप्रकाशकाराच्या खुब्या समजल्या व **काशीनाथ** (कऱ्हाडा) चरणारविंदपरागावर पुष्कळ महिने लोळले तेव्हां रामभाऊंस कौमुदीची योग्यता कळून आली. सारांश इतर जातींतील पुरुषांचे उपकार आपणावर मुळींच झाले नाहींत असें ह्मणण्यास हल्लींच्या काळांत कोणत्याही जातींतील पुरुषाची छाती होणें नाहीं. उपकार फेडून घेण्याचा प्रसंग परमेश्वर कोणाही उपकर्त्या- स्त्रयांनीं व तिसऱ्या शेणवी डाक्टरानें छापण्याचा खर्च सोसून अखेरीस काळबादेवीवरील मेमणांच्या दुकानांतही सह्याद्रिखंडाची रेलचेल करून सोडली. राजाराम रामकृष्ण भागवत यास **सह्याद्रिखंडाची प्रत तयार करण्यास किंवा प्रूफ तपासण्यास ठेविलें नव्हतें.** तर डा. कुन्हा यांनीं **सह्याद्रिखंड सगळें छापून बाहेर पडल्यानंतर त्याचें इंग्रजी भाषांतर कर्तव्य होतें ह्मणून पगार देऊन** भागवतास ठेविलें होतें. अशी इत्थंभूत हकीकत असतां जात्यभिमानाचें पित्त खवळून कांहींना कांहीं 'जशास तसा' वर लिहिण्यास संकल्प केला, ह्मणून रामभाऊ सारख्या

स न आणो. तरी जर प्रसंग आला तर यथाशक्ति प्रत्युपकार करण्यास रा. रा. भा. चें घराणें आजपर्यंत चुकलें नाहीं व पुढेंही चुकणार नाहीं. रा. रा. भा. चे वडील गरीब होते व चुलतेही श्रीमंत नाहींत, व रा. रा. भा. ही लक्ष्मीचा लाल नाहीं. तरी ज्या शेणवी सद्गृहस्थाचे उपकार रा. रा. भा. च्या वडिलांवर झाले ते वडील होते तोंपर्यंत विसरले नाहींत व चुलतेही हल्लीं विसरले नाहींत. रामभाऊ जर याविषयीं बारकाईनें चौकशी करतील तर त्यांस यश आल्याशिवाय रहाणार नाहीं. जातीचा दुरभिमान बाळगून महाराष्ट्र ब्राह्मणांस त्रास देणारे शेणवी पूर्वींही होते, नव्हते असें नाहीं. सुज्ञ पुरुषाचीही ही अशी अत्यंत शोचनीय स्थिति झाली ! 'अविवेक:परमापदां पदम्', या भारवीच्या किराताच्या दुसऱ्या सर्गांत उपदेश केलेल्या खरोखरी अमोलिक मंत्राचें पुरश्चरण रामभाऊंनीं जरूर करावें, त्यांतच त्यांचें कल्याण आहे). ३७–(उत्तर नाहीं. 'जशास तशां' त ( पृ० ) रामभाऊंबरोबर गांवस्कर महा पंडिताचेंही नांव आलें आहे. असें असतां 'सतीची चाल पेशव्यांनीं घातली' हें काय समजून रामभाऊंनीं आपणावर ओढून घेतलें ?) ३८–( उत्तर नाहीं). ३९–(पृ० ६६ व ६७ या दोन पृष्ठांवर खटाराभर शिव्या आहेत. प्रतिवादीवर कांहीं लागू होण्यासारखें नसलें ह्मणजे

पण ते त्या वेळीं मोठ्या समुद्रांत टाकलेल्या खसखशीच्या दाण्यांप्रमाणें होते. शेणव्यांनीं रा. रा. भा. चें व त्याच्या घराण्याचें नुकसान केलें, नाहीं असें नाहीं. एकानें तर पुष्कळ वर्षें मित्र ह्मणवून शत्रूही सहसा करण्यास धजणार नाहीं असली कृति केली व रा. रा. भा. स व त्याच्या जातीबरोबर सर्व महाराष्ट्र ब्राह्मणांस हवीं तशीं विशेषणें लावून एका अन्यजातीय सज्जनाच्च, तो वळला नाहीं असें पाहून, बरेंच नुकसान केलें. तरी रा. रा. भा. नें त्या मित्राच्या विरुद्ध, किंवा तो शेणवी होता ह्मणून शेणवी जातीच्या विरुद्ध, आपल्या मित्रमंडळांत किंवा अन्यत्र एक चकार शब्दही काढलेला नाहीं. 'शेणव्यांत वादीनें तोंड सोडायाचें; व प्रतिवादी अपशब्दांच्या गडगडाटानें हटला अशी कल्पना करून स्वतःचें समाधान करायाचें ). ४०—(उत्तर नाहीं). ४१—(उत्तर नाहीं). ४२—(रा. रा. भा. ला मराठी समजत नाहीं ह्मटलें तर त्याचा राग नाहीं. पण रामभाऊंनीं या निमित्तानें आपली चूक बरीच कबूल केली ही एक आनंदाची गोष्ट आहे. या मुद्याच्या बाकी राहिलेल्या उत्तराच्या संबंधानें 'आत्याबाईस मिशा असत्या तर काका ह्मटलें असतें' या मराठी ह्मणीची रामभाऊंस आठवण करून दिली ह्मणजे रा. रा. भा. चें कर्तव्य आटपलें ). ४३—(पहिली चूक कबूल केली. दुसरी विषयीं

जन्मून शेणव्यांचा . तुह्मीं उद्धार चांगला केलात असें मात्र एकदां रामभाऊंस विविधज्ञानविस्तार हफ्‌ीसांत ह्मणण्याचा प्रसंग आला. पण 'कऱ्हाड्यांत जन्मून कऱ्हाड्यांचा उद्धार तुह्मीं चांगला केलात,' असा रा. रा. भा. स म्हण्‌तांच रामभाऊंनीं उद्धार चकार शब्दही नाहीं). ४४–(उत्तर नाहीं.) ४५–रा. रा. भा. शिलालेख बनावट असावा असा तर्क करितो ह्मणूनच तो असत्य. (तेव्हां रा. रा. भा. नें शेणव्यांस षट्कर्मी ब्राह्मण ह्मटलें ह्मणजे ते त्रिकर्मी ठरलेच!!!) ४६–(उत्तर नाहीं).

काढिला, तेव्हां रा. रा. भा. चा नाइलाज होऊन त्यास 'जशास तसें' पुन: एकदां करावें लागलें. अशी जरी कित्येक शेणव्यांची कृति आहे तरी त्यांच्या सर्व जातीस ह्मणून रा. रा. भा. दूषण लावीत नाहीं, व पुष्कळ वर्षें जातिभेद न बाळगतां जसा सर्वांशीं स्नेह रा. रा. भा. नें ठेविला तसाच हल्लीं तो ठेवितो व पुढेंही ठेवील. क्वचित् स्वार्थपर होऊन साक्षाज्जनकानें अपत्याचा त्याग केला असें आढळलें व अपत्याचा पोषक जरी रामभाऊंच्या जातीचा असला तरी पूर्वींच्याप्रमाणें आपलें थोडें बहुत नुकसानही करून घेऊन आपल्या गरीबीप्रमाणें आश्रय देण्यास व पराच्याही अपत्याचें वर्ष दोन वर्षें यथाशक्ति पोषण करि

ण्यास पुनः प्रसंग आला तर रा. रा. भा. चुकणार नाहीं. रा. रा. भा. स, त्याच्या जातीस व सर्व महाराष्ट्र ब्राह्मणांस जसें ज्यास हवें तसें त्यानें गालिप्रदान करावें. त्यानें कांहीं आंगास क्षतें पडत नाहींत. भर्तृहरीनें 'ददतु ददतु गालीर्गालिमंतो भवंतो वयमपि तदभावाद्गालिदानेऽसमर्थाः॥ जगति विदितमेतद् दीयते विद्यमानं 'असें ह्मटलें आहे तें या स्थलीं यथार्थ आहे. जातिभेद रा. रा. भा. स कबूल नाहीं. रामभाऊंनीं रा. रा. भा. च्या मित्रमंडळाजवळ खुशाल चौकशी करावी. विघ्नें आल्यास असल्या प्रसंगीं खरोखरी बंधुभूत विघ्नराज गणेशाचें चिंतन करावें ह्मणजे सर्व विघ्नें दूर होऊन लागलीच रामभाऊंची कार्यसिद्धि होईल. जर रामभाऊंनीं ब्राह्मणांच्या जुलमांतून इतर जातींस मुक्त करिण्याचें महाव्रत घेतलें असतें तर रा. रा. भा. लेखणी कधींही न उचलता. पण रामभाऊंचा उद्देश महाराष्ट्र ब्राह्मणांचे आधिकार त्यांस हलके ठरवून स्वतः बळक-विण्याचा दिसला. महाराष्ट्र ब्राह्मणांची निंदा करणारे रामभाऊ वगैरे शेणवी जर इतर जातींस आपल्या पंक्तीस घेतलि व मग महाराष्ट्र ब्राह्मणांवर अपशब्दांचे भडिमार चालवतील तर त्यांस कोणी ढोंगी किंवा दांभिक तरी ह्मणणार नाहीं. पण तसें करीत नाहींत, त्यापक्षीं हे आप-

मतलबानें महाराष्ट्र ब्राह्मणांची निंदा करितात अशी शंका आली व त्यामुळें लेखणी उचलणें भाग पडलें. रावबहादुर पंडितां सारखे जे खरोखरी उदार दिलाचे पुरुष शेणवी जातींत आहेत, त्यांच्याविषयीं रा. रा. भा.ची मोठी पूज्य बुद्धि आहे. यावरून 'जशास तसें' लिहिण्याचा उद्देश वाचकाचे लक्षांत आल्याशिवाय रहाणार नाहीं.

ता० क०—**इतःपर** या विषयाच्या संबंधानें लेखणी उचलणें रा. रा. भा. कडून होणें नाहीं, कारण रामभाऊंची अरे तुरे पर्यंत मजल आली ती सर्व भांडवल सरून गेल्यामुळेंच अशी **आतां** रा. रा. भा. ची पूर्ण खात्री झाली. जातीच्या संबंधानें कुत्सितपणाचे लेख लिहून वैरभाव वाढविण्यापेक्षां गप्पा मारीत बसणें किंवा पत्ते खेळून बावन्नपानी कोट देणें व घेणें हें रा. रा. भा. स अधिक चांगलें दिसतें. महाराष्ट्र ब्राह्मणांची निंदा करून वैर वाढविण्याचें काम **इतःपर** रामभाऊंनीं बिनधास्त करावें. पण त्यापासून महाराष्ट्र ब्राह्मणांच्या कासपटास तरी धक्का लागेल असें जर रामभाऊंस वाटत असेल तर त्यांची मोठी चुक आहे. सोरा, सूर्यखार व गंधक यांच्या राशी पुष्कळ पडल्या आहेत. पण त्यांच्यावर पेटलेली मशाल टाकण्याचें श्रेय रा. रा. भा. स नको. इतरांच्या अन्य 'भ्रमां'चा 'निरास' जरी

रामभाऊंच्या 'भ्रमनिरासा'नें झाला नाहीं, तरी सभ्यपणा व पोक्तपणा या दोहोंचा त्याग करून गांवस्कर मेहूपाटील व दळवी दादा यांच्या पंक्तीस रामभाऊ कधींही बसणार नाहींत असा पुष्कळांस एक 'भ्रम' होता त्याचा तरी चांगला 'निरास' झाला व 'भ्रमा'चा भोंपळा फुटल्यामुळें 'जशास तसें भेटे व मनींचा संशय फिटे' या रामभाऊंनींच अखेरीस सादर केलेल्या वाक्यास सार्थकितत्व आलें.

---

# FOR SALE.

| | Rs. | as. |
|---|---|---|
| Pandurang Hari | 1 | 4 |
| The Bombay Dancing Girls | 1 | 0 |
| The Bombay Beggars and Criers | 1 | 0 |
| The Prabhu Street Directory 1878 | 0 | 8 |
| Womanish or how my neighbour married his Boy and Girl | 0 | 8 |
| The Island of Angediva | 0 | 8 |
| The Economy of Human Life, in 2 parts, price per part | 0 | 4 |
| The Enchanted Fruit | 0 | 4 |
| The Governors of Bombay | 0 | 4 |
| Brahmanical Institution of Caste | 0 | 3. |
| Shukshma Dnyan | 0 | 2 |
| The Hindu Clerks, A brief Account | 0 | 2 |
| Liquor Drinking in India | 0 | 2 |
| Marathi School and School Masters | 0 | 2 |

| | Rs. | As. |
|---|---|---|
| Pleasure Parties in Ancient India............................ | 0 | 2 |
| Flesh-eating in Ancient India | 0 | 1 |
| | आ० | पै० |
| सरस्वतीमंडलाच्या स्वरूपाचें निरूपण. | ४ | ० |
| अग्निक्रीडा चमत्कार | २ | ० |
| वज्रेश्वरी | ८ | ० |
| पंढरीचा विठोबा ( पद ) | १ | ० |
| गंगालहरी ( टीकेसहीत ) | ४ | ० |
| वीरपत्नी प्रत्येक अंकास | ३ | ० |
| आर्यनीतिसुधा ( भगवद्गीतेंतील वेंचे ) | १ | ० |
| साध्वी स्त्री | ० | ६ |
| श्री पांडुरंगाच्या काकड व शेजारत्या व मौंजी, विवाह अष्टकें इ० इ० | ३ | ० |
| स्त्रीगीतमाला. भाग १ | १ | ० |
| आगमप्रकाश, ट. हं. सुद्धां रु० २ | ४ | ० |

वरील पुस्तकें मुंबईंत 'फ्यामिलि प्रिंटिंग प्रेस' मध्यें विकत मिळतील. टपाल हशील प्रत्येक पुस्तकास अर्धा आणा जास्त पडेल. टिकीटा वर्तवळ्यासह पाठवाव्या. नॉट पेड पत्र घेतलें जाणार नाहीं.